


# आमवाताची औषधे

सुजेच्या संधिवातासाठी रासायनिक किंवा जैविक औषधे वापरतात. त्यामुळे आमवाताची सूज ओसरते, दुखणे कमी होते, आजार नियंत्रणात येतो, कार्यक्षमता सुधारते आणि सांधे आणखी खराब होणे टळू शकते. रासायनिक औषधांपैकी क्लोरोक्विन आणि सल्फासॅलॅझिन ही औषधे प्रतिकारशक्तीवर नियंत्रण आणून सूज कमी करतात. ही दोन्ही औषधे त्यामानाने साधी तर मेथोट्रॅक्सेट आणि लेफ्लुनामाइड ही जास्त परिणामकारक. मेथोट्रॅक्सेट आणि लेफ्लुनामाइड मुळे आमवातात सूज निर्माण करणाऱ्या पेशी कमी होतात (Cytotoxic) आणि आजारावर नियंत्रण येते. मेथोट्रॅक्सेट हे आमवाताचे प्रधान औषध. त्याने आजार कमी झाला नाही तर इतर औषधे जोडीने देतात.त्यानेही नाही भागले तर जैविक औषधे वापरतात. औषधांनी आमवात नियंत्रणात येतो पण पूर्ण बरा होत नाही किंवा समूळ नष्ट होत नाही. त्यामुळे अल्पमात्रेत का होईना औषध घेत राहिले पाहिजे. मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाची औषधे सतत घेतात तसेच. आमवाताच्या ५–१०% रुग्णांमध्ये २–३ वर्षांनी औषध बंद ही होऊ शकते. तीन ते सहा महिन्यात आजार नियंत्रणात आला नाही तर औषध वाढवणे किंवा बदलणे असा पर्याय शोधला पाहिजे.

## क्लोरोक्विन

सिंकोना वनस्पतीच्या खोडापासून क्विनाइन मिळाले. मलेरियासाठी पूर्वी हीच वनस्पती वापरत. त्याच्या पुढच्या आवृत्या म्हणजे क्लोरोक्विन आणि हायड्रॉक्सिक्लोरोक्विन. त्याने आमवाताची सूज कमी होते. रक्तातली चरबी कमी होऊन रक्तवाहिन्यांचे आरोग्य चांगले रहाते हा आणखी एक फायदा. यापैकी क्लोरोक्विन अगदी स्वस्त. ही औषधे रात्री घेतली म्हणजे त्वचा फारशी काळसर पडत नाही. जेवणानंतर घेतली म्हणजे पित्त वाढत नाही. जन्मत: जी–६–पीडी हे संप्रेरक (Enzyme) कमी असले तर क्लोरोक्विनचे विशेष दुष्परिणाम होतात. केस पांढरे होणे, कानात आवाज येणे, मांड्यांच्या स्नायूंचा अशक्तपणा असे परिणाम दीर्घकाळ क्लोरोक्विन घेणाऱ्या

रुग्णांमध्ये क्वचित दिसतात. डोळ्यासमोर काजवे चमकणे, अंधुक दिसणे, वस्तूचा एखादा भाग न दिसणे (दोन्ही हातांनी पेपर उघडून वाचताना मधल्या बातम्या गायब) असे याचे डोळ्यावरचे दुष्परिणाम. ते टाळण्यासाठी क्लोरोक्विन व हायड्रॉक्सि-क्लोरोक्विन वापरणाऱ्या रुग्णांनी अनुक्रमे ६ ते १२ महिन्यांनी नेत्रतज्ञांकडून दृष्टीक्षेत्र (Field of vision) तसेच इतर तपासणी न चुकता करून घ्यावी. क्लोरोक्विनसोबत कडुनिंबाचा रस घेतला तर त्याची कार्यक्षमता वाढते असे उंदरांमध्ये दिसून आले. दोन कडू रस एकत्र आले तर आयुर्वेदाच्या सिद्धांताप्रमाणे असेच होणार.

**क्लोरोक्विन गोळी २५० मि.ग्रॅ.; हायड्रॉक्सिक्लोरोक्विन गोळी २०० व ४०० मि.ग्रॅ.**


## सल्फासॅलॅझिन

सल्फा गटातल्या या औषधाची त्वचेवर खाज, लालसरपणा, पुरळ अशी ॲलर्जी येऊ शकते. यासाठीच या औषधाचा सुरूवातीला थोडा डोस देतात आणि पुढे दर आठवड्याला वाढवतात. त्याने पिवळट नारिंगी रंगाची लघवी होते. डोळ्यातले पाणीही त्याच रंगाचे येते. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. कॉन्टॅक्ट लेन्सेस खराब होण्याची शक्यता असल्याने त्या मात्र वापरू नये. पोट बिघडणे, भूक मंदावणे या नेहमीच्या उपद्रवांसोबत क्वचित याचा पांढऱ्या पेशींवर तसेच यकृतावर परिणाम होतो. सल्फा औषधांचे जोडीने थोडेसे फोलिक ॲसिड हे जीवनसत्त्व घेणे आवश्यक आहे.

**सल्फासॅलॅझिन गोळी ५०० मि.ग्रॅ. व प्रदीर्घ प्रक्षेप (Sustained Release) १००० मि.ग्रॅ.**

## मेथोट्रेक्सेट

मेथोट्रेक्सेट हेच आमवाताचे मुख्य औषध. २-३ महिन्यातच त्याचे सुपरिणाम दिसू लागतात. मेथोट्रेक्सेट कॅन्सरसाठी वापरतात पण ते फार मोठ्या डोसमध्ये. आमवातात आठवड्यात एकाच दिवशी ७.५ -२५ मि.ग्रॅ. इतका छोटासा डोस पुरतो. मेथोट्रेक्सेट हे दररोज घेण्याचे औषध नाहीच. आपल्या सोयीने आठवड्यातला एखादा वार निश्चित करून त्या वाराला नियमाने औषध घ्यावे. दुष्परिणाम टाळण्यासाठी त्यासोबत फोलिक ॲसिड घेणे अत्यावश्यक आहे. मात्र मेथोट्रेक्सेट आणि फोलिक ॲसिड मध्ये निदान २४ तासांचे अंतर असावे. मल्टिव्हिटॅमिनच्या गोळ्यांमध्ये फोलिक ॲसिड असते. त्यामुळे मेथोट्रेक्सेटच्या दिवशी मल्टिव्हिटॅमिनही घेऊ नये. मेथोट्रेक्सेटचे इंजेक्शन (चौकट पहा) घेतले तर कमी डोस पुरतो आणि पोट बिघडत नाही. काही ॲन्टिबायोटिक्स आणि दम्याचे थिओफायलिन अशी औषधे मेथोट्रेक्सेट सोबत काळजीपूर्वक घ्यावीत. मेथोट्रेक्सेटमुळे क्वचित भूक मंदावते, तोंड येते, आणि हिरड्या सुजतात तर कधी रक्तातल्या पांढऱ्या पेशी कमी होतात अथवा यकृतावर



### मेथोट्रेक्सेट – साप्ताहिक इंजेक्शन

मेथोट्रेक्सेट इंजेक्शन इन्शुलिनसारखे मांडीवर किंवा पोटावर इन्शुलिन सिरिंजने आठवड्यातून एकदा घेतात. एक सी.सी. द्रवात २५ मि.ग्रॅ. औषध असते. म्हणजेच ४० युनिट प्रति सीसीच्या इन्शुलिन सिरिंजमध्ये ४ युनिटचे अडीच मि.ग्रॅ. होतात. इंजेक्शन सांगितलेल्या डोसनुसार इन्शुलिन सिरिंजमध्ये भरावे. त्वचा स्पिरिट अथवा आयोडिनने स्वच्छ करावी. त्वचा चिमटीत धरून सुई बाजूने त्वचेखाली तिरपी सरकवावी. सिरिंजचा दट्ट्या (Piston) मागे ओढून रक्त येत नसल्याची खात्री झाली की औषध टोचावे. त्यानंतर सुई काढून घ्यावी आणि स्पिरिटच्या बोळ्याने थोडे दाबून धरावे. चोळू नये. सुई अगदी बारीक असल्याने इंजेक्शन फारसे दुखत नाही. मधुमेहाचे रुग्ण रोज असे इंजेक्शन घेतात. आमवातात मात्र ते आठवड्यातून एकदाच घ्यायचे असते.

परिणाम होतो. त्यासाठी डॉक्टरी सल्ल्याने वारंवार रक्ततपासणी करावी लागते. अपाय दिसल्यास औषध बंद करून फोलिक ॲसिड दिले म्हणजे सामान्यपणे गाडी पुन्हा रुळावर येते. त्यानंतर पुन्हा कमी मात्रेत मेथोट्रेक्सेट सुरु करतात. खोकला आणि दम लागणे ही मेथोट्रेक्सेटच्या फुफ्फुसांवरील दुष्परिणामांची लक्षणे. तेव्हा मात्र औषध बंद करून त्वरित डॉक्टरांना भेटणे अत्यावश्यक आहे. मेथोट्रेक्सेटमुळे प्रतिकारशक्ती कमी होत असल्यामुळे नागीण (Herpes zoster) आणि टीबी सारखे वेगवेगळे जंतुसंसर्ग तसेच काही प्रकारचे कॅन्सर होण्याची शक्यता वाढण्याचा धोकाही संभवतो. यकृतावरील अनिष्ट परिणामामुळे हे औषध सुरु असताना मद्यपान कटाक्षाने टाळावे.

**मेथोट्रेक्सेट गोळी २.५, ५, ७.५, १०, १२.५, १५ मि.ग्रॅ.**
**इंजेक्शन – १५ मि.ग्रॅ./मिली ॲम्प्यूल; २५ मि.ग्रॅ. /मिली व्हायल (बाटली) २ मि.ली. (५० मि.ग्रॅ.)**

## लेफ्लुनामाइड

लेफ्लुनामाइड हे ही आमवाताचे एक महत्वाचे औषध आहे. त्याची गोळी रोज घ्यायची असते. सुपरिणाम दिसायला इतर औषधांसारखेच ३ ते ५ महिने लागू शकतात. हे औषध घेताना गर्भारपणाला परवानगी नाही. औषध बंद केले तरी सुमारे दोन वर्षेपर्यंत शरीरात रहाते. त्यामुळे मूल होण्याची इच्छा असलेल्या स्त्री पुरुषांनी हे औषध घेऊ नये. चुकून घेतले गेले तर अकरा दिवस कोलेस्टायरामाइन देऊन निर्विषीकरण केले पाहिजे. पोट बिघडणे, दुखणे, जळजळणे अशा सामान्य उपद्रवांखेरीज वजन कमी होणे, रक्तदाब वाढणे, अशक्तपणा, हातापायात मुंग्या किंवा बधिरपणा येणे तसेच सूक्ष्म रक्तवाहिन्यांच्या सुजेमुळे विशेषत: पायावर पुरळ येणे अशा तक्रारी या औषधामुळे उपस्थित होऊ शकतात. लेफ्लुनामाइड हे साधे औषध नाही. त्याचा वापर तज्ञांच्या सल्ल्याने काळजीपूर्वक केला पाहिजे. यकृतावरील अनिष्ट परिणामांमुळे हे ही औषध सुरू असताना मद्य पिऊ नये.

**लेफ्लुनामाइड गोळी १०, २० मि.ग्रॅ.**

## जैविक औषधे

इटानरसेप्ट, इन्फ्लिक्सिमॅब, रिटुक्सिमॅब अशी नवी जैविक औषधे महाग असली तरी रासायनिक औषधांना दाद न देणाऱ्या आमवातात अनेकदा जादूसारखा परिणाम दाखवतात. टी.एन.एफ., इन्टरल्युकिन अशा सूज निर्माण करणाऱ्या घटकांचे नियंत्रण करणे, पांढऱ्या पेशींमध्ये बदल घडवणे यासारखी वेगवेगळी कार्ये वेगवेगळी जैविक औषधे करतात आणि आमवातावर नियंत्रण आणतात. त्यांचा वापर कोणत्या परिस्थितीत कसा करावा याविषयी ऱ्हुमॅटॉलॉजीचे अमेरिकन कॉलेज, युरोपियन लीग

तसेच इंडियन असोसिएशन या साऱ्यांनी मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. ही औषधे ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट तज्ज्ञांकडूनच घेतली पाहिजेत. इटानरसेप्टचे इंजेक्शन इन्शुलिनसारखेच. ते आठवड्यातून एकदा किंवा दोनदा घेतात. इतर इंजेक्शनसाठी मात्र हॉस्पिटलमध्ये जावे लागते. शिरेतून घेण्याच्या इंजेक्शनसाठी २-६ तास लागतात. जंतुसंसर्ग आणि कॅन्सरची शक्यता हे या औषधांमुळे होऊ शकणारे दुष्परिणाम. भारतात टीबीचे प्रमाण जास्त असल्याने तशी लक्षणे नसली तरीही ही औषधे सुरू करण्यापूर्वी तपासण्या करून टीबी विषयी खात्री करावी लागते. औषध सुरु असताना ताप येणे, घसा धरणे, रात्री घाम येणे, लघवी करताना जळजळणे अशी जंतुसंसर्गाची किरकोळ लक्षणे दिसली तरी डॉक्टरांना त्वरित भेटावे. पोट दुखणे, भूक मंदावणे, वजन कमी होणे, काखेत किंवा जांघेत गाठी येणे ही लक्षणेही अशीच उपद्रवसूचक आहेत. इंजेक्शनमुळे स्थानिक अथवा सार्वदेहिक ॲलर्जी होऊ शकते. क्वचित मेंदूवरही दुष्परिणाम होतात.

जैविक तसेच अन्य औषधांवर सध्या फार मोठ्या प्रमाणावर संशोधन सुरु आहे. नवनवी उत्तमोत्तम औषधे बाजारात येत आहेत. ती महाग असली तरी प्रस्थापित औषधांना दाद न देणाऱ्या आमवाताच्या रोग्यांसाठी वरदानच आहेत.

❖ ❖ ❖

### लसीकरण

आमवात हा प्रतिकारशक्तीचा आजार. शिवाय औषधांनीही प्रतिकारशक्तीवर परिणाम होतो. म्हणूनच अशा रुग्णांनी वेळेवर लसीकरण करून घेऊन रोगप्रतिबंध केला पाहिजे. गोवर, गालगुंड (Mumps), रुबेला, पीतज्वर, टायफॉइड आणि बी.सी.जी. (क्षयासाठी) या लसींमध्ये जिवंत जंतू असतात. त्यामुळे त्या वापरू नयेत. टिटॅनस (दर १० वर्षांनी), न्युमोनिया (दर ५ वर्षांनी), इन्फ्लुएन्झा (दर वर्षी) यांच्यासाठी नियमित लसीकरण करून घ्यावे. स्वाइन फ्लूसाठी मृत विषाणूंची लस वापरावी. कुत्रे चावल्यास, तसेच टायफॉइडसाठी अकार्यक्षम (Inactivated) जंतूंची लस वापरावी.

संदर्भ : संधिवात औषधे आणि आहार-विहार

**डॉ. श्रीकान्त वाघ**
एम.बी.बी.एस. (मुंबई), एम.डी. (मेडिसिन), एम.एस्सी. ऱ्हुमॅटॉलॉजी (युके)
बी.ए.एम.एस., एम.ए.एस्सी. (चिकित्सा), एम.ए. (संस्कृत) एम.ए. (संगीत)
ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट (संधिविकार विशेषज्ञ)